रेड फॉक्स आणि त्याची छोटी नाव

नथानिएल बेंचली

चित्र : अर्नोल्ड लोबेल

मराठी : अश्विनी बर्वे





रेड फॉक्स आणि त्याची छोटी नाव

नथानिएल बेंचली

चित्र : अर्नोल्ड लोबेल

मराठी : अश्विनी बर्वे



सगळ्या इंडियन मुलांसारखी रेड फॉक्सकडे मासे पकडण्यासाठी एक छोटी नाव होती. पण त्याला एक मोठी नाव हवी होती.





तो आपल्या वडिलांकडे गेला आणि म्हणाला, “मला एका नव्या नावेची गरज आहे. तुम्ही ती मला तयार करून द्याल का?”

“जरूर,” वडील म्हणाले. “तुला किती मोठी नाव हवी आहे?”





“मला जगातली सगळ्यात मोठी नाव हवी आहे,” रेड फॉक्स म्हणाला.

“माझी नाव इतर सगळ्यांपेक्षा मोठी असायला हवी.”

“हे योग्य नाही,” त्याचे वडील म्हणाले.


“पण चल जंगलात जाऊ या आणि बघू या.”







मग ते जंगलात गेले. तिथं त्याच्या वडिलांनी नावेसाठी झाड शोधले. प्रत्येक वेळी जेव्हा वडिलांनी एखादं झाड पाहिलं की रेड फॉक्स त्या झाडापेक्षा मोठं झाड बघे.






शेवटी त्याच्या वडिलांनी एक झाड कापलं आणि त्याच्या आत आग पेटवली. “ही तुझ्यासाठी खूप मोठी होईल. पण अजून तू मोठा होत जाशील,” ते म्हणाले.

रेड फॉक्सने झाडाचे जळलेले लाकून खरडायला मदत केली. तो म्हणाला, “माझ्यासाठी कोणतीही नाव मोठी नाही. आणि ती जेवढी मोठी असेल तेवढा मी खुश होईल.”

त्यांनी जळालेलं लाकुड पूर्ण साफ केलं. मग वडील म्हणाले, “ठीक आहे, ही झाली तुझी नाव. तू ती उचलू शकतो का?”

"ज़रूर,“ रेड फॉक्स म्हणाला.

“सहज!”







मग त्यांनी नाव पाण्यात घातली.
रेड फॉक्स त्यात बसून पुढे निघाला.
"ओह यार!" तो म्हणाला. “आता बघा
मी एक लाख मासे पकडेल.”



त्याने खूप वेळ मासे पकडले आणि
जेव्हा तो लाखाचा अर्धा आकडा
पार करत होता तेव्हा त्याला काही
चित्रंविचित्र आवाज ऐकू आले.
छप-छप! क्रंच! स्प्लिट!







तो तिथं बघायला गेला...तिथं
पाण्यात एक अस्वल मासे
पकडण्याचा प्रयत्न करत होते.



जेव्हा रेड फॉक्स थोड़ा जवळ आला, तर अस्वलाने रेड फॉक्सने पकडलेले खूप सारे मासे बघितले. "अरे!" अस्वल म्हणाले.

“बास मला याचाच शोध होता!”

"अरे, खाणं बंद कर!" रेड फॉक्स ओरडला. “ते सगळे मासे माझे आहेत!”

“नाही, आता ते तुझे नाही,” अस्वल म्हणाले. आणि अस्वलाने ते सगळे मासे खाल्ले.








“आता मी जाऊ शकतो का?” रेड फॉक्स ने विचारले. जेव्हा अस्वलाने मासे खाणं बंद केलं तेव्हा.

"ज़रूर," अस्वल म्हणाले.


“आणि मी पण तुझ्या बरोबर येत आहे. हा मासे पकडण्याचा चांगला मार्ग आहे. आता चल.” आणि मग रेड फॉक्सने नाव चालवायला सुरुवात केली.

थोड्या वेळाने अस्वलाचा एक मित्र दिसला. "इकडे बघ!" तो म्हणाला. "ये तू पण पार्टीत सामील हो!"



“अल पण येवू शकतो का?” मित्राने विचारलं.


"ज़रूर," अस्वल म्हणाले. “ही एक मोठी नाव आहे. तू तुझ्याबरोबर अलला सुद्धा घे.”





मग अलपण बरोबर आला. आणि
तिन्ही अस्वलांनी मासे पकडले..

रेड फॉक्सने नावेला पॅन्डल मारून पुढे नेली.
म्हणजे तरी त्याची अस्वलापासून सुटका
होईल.



रेड फॉक्सने अस्वलांपासून सुटका
व्हावी म्हणून एक युक्ती केली.
"अरे, ज़रा इकडे बघा!”तो म्हणाला.
“जरा पाण्यात बघा!” सगळी अस्वलं
वळून बघू लागली, आणि त्यांची
नाव पलटली.

पण रेड फॉक्स स्वतःची नाव सरळ करण्याच्या आधीच, दोन पानमांजरं त्यात बसले.


"धन्यवाद," एक पानमांजर म्हणाले. “आम्ही पाण्यात खेळून खेळून थकून गेलो होतो.”

“चांगली गोष्ट आहे ही एक मोठी नाव आहे,” दुसरं पानमांजर म्हणालं. “आपण इथं मासे पकडू शकतो.”

“त्या तिकडे जा. तिथं अधिक मासे आहेत.”



जसे ते झाडाच्या फांदी खालून गेले, एक रेकुनने नावेत उडी घेतली. “माफ करा,” तो म्हणाला. “मला मासाचा एक तुकडा धुवायचा आहे.”





मग अस्वलांना झोप यायला लागली.
“तू,” एका अस्वलाने रेड फॉक्सला म्हटले.
“थोडा बाजूला हो, मला एक डुलकी घ्यायची आहे.” “मी नाही होवू शकत,” रेड फॉक्स म्हणाला.
“मला बाजूला सरकायला जागाच नाही.”
“मग नावेतून बाहेर निघ,” अस्वल म्हणाले. “माझ्यासाठी ते बरं होईल.”
“नाही, मी असं करणार नाही!” रेड फॉक्स म्हणाला.
“ही माझी नाव आहे, तू इथून निघ!””
“ही एक मोठी नाव आहे,” अस्वल म्हणाले “यात सगळ्यांसाठी जागा आहे.” आणि मग अस्वल झोपायला गेलं.



रेड फॉक्सला नावेच्या पुढच्या भागाकडे ढकलून दिलं. “कमीत कमी तुम्ही तरी नाव सोडू शकतात.” रेड फॉक्स पानमांजरांना म्हणाला. “तुम्हांला माहित आहे ही माझी नाव आहे.” “आम्हांला पण झोप येत आहे,” रानमांजर म्हणाले."

मग ते अस्वलावर चढून झोपले..

“तुझं काय?” रेड फॉक्सने रेकुनला विचारलं. “तू मला माझ्या नावेतून परत जावू देणार आहे का?” रेकुनने उत्तर देण्याच्या आधी एक मूस आला. “इथं मजेदार वाटतं आहे,”तो म्हणाला. “मी आत येवू शकतो का?”






“आत येवू?” रेड फॉक्स म्हणाला.

“तू काय वेडा आहे का?”

पण मुसने आपला एक पाय नावेत ठेवला.





आणि मग जोरात तुटण्याचा आवाज आला!





मग नावेचा खेळ संपला. “मी काही चूक केली का?” मुसने विचारलं.

"अरे, नाही,“ त्यातलं एक अस्वल म्हणालं. “बघ, तू आता आता आमची नाव तोडली.”



"माफ़ करा," मूस म्हणाला.
“मला ही सार्वजनिक नाव वाटत
होती.” आणि मग मूस निघून
गेला. आता नावेचे जे काही
वाचलं होतं ते सगळ्यांच्या
समोर होतं. नावेचे दोन तुकडे
फक्त वाचले होते.







मग रेड फॉक्सने ते सगळे एकत्र केले आणि त्यांना वेली, फांद्या आणि झाडाची साल घेवून करकचून बांधलं.



नवीन नाव, पहिल्या नावे
पेक्षा खूप छोटी होती. पण
ती तरंगत होती.



आणि त्या नावेत बसून
रेड फॉक्स सुरक्षित घरी पोहचला.
घरात सगळ्यांनी त्याचा
जयजयकार केला..





वडिलांशिवाय कोणीही त्याच्या एका शब्दावरही विश्वास ठेवला नाही.

समाप्त